# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०९.०६.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०८/०६/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४३,५५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०८/०६/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १०,१८०/— रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०८/०६/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ५,८८०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. ०८/०६/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०२ तसेच वसमत शहर व गोरेगाव येथे प्रत्येकी ०१असे एकुण ०४ इसमाविरूध्द कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.